“आपले मंडळ ”


|| *Maharashtra Mandal of Detroit* ||

# स्नेहबंध

# विघ्नहर्ता

## विशेषांक

सप्टेंबर २०२४



।। गणपती बाप्पा मोरया ।।

# Happy Ganesh Chaturthi

Avinash, Hema, Ruchi, Akash and Adarsh Rachmale



## The N. Rachmale Foundation

**Prosperity Through Service**

Avinash and Hema Rachmale

| Sky Group Inc. | Lakeshore Healthcare Group (LHG) | Lakeshore Global |
| --- | --- | --- |
| Sky Group Grand, LLC.<br>Real Estate Group | Lakeshore Healthcare Group, Inc.<br>Nursing Home & Managed Care | Lakeshore Global<br>Infrastructure Contractors |

www.therachmalefoundation.org | www.Lgccorp.com

# अनुक्रमणिका


| अनु.क्र. | लेख / कविता - नाव | लेखक / कवी | पृष्ठ क्र. |
|---|---|---|---|
| १ | अध्यक्षांचे मनोगत | प्रशांत जावकर | ४ |
| २ | शाळेसि जाताना | डॉ. वीणा शहा | ११ |
| ३ | वानप्रस्थ | सुरेश नायर | १८ |
| ४ | आजीची पावभाजी | अभिजित जोगदेव | २५ |
| ५ | जीवन दुःखमय झाले आहे का? | अरुणा मुल्हेरकर | ३१ |
| ६ | चिरा... | पूनम तोरगल | ३८ |
| ७ | A Unique Opportunity | नेहा ऐगळीकर | ४६ |


लेखकांना, चित्रकारांना आणि वाचकांना संपूर्ण मतस्वातंत्र्य देण्यात आले आहे. लेखांतून व चित्रांतून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक किंवा आपण सहमत असूच असे नाही, तेंव्हा आपण हा अंक केवळ "मनोरंजनासाठी" आहे अशी अपेक्षा ठेवून वाचावा, ही विनंती!


**संपादक :** ज्योत्स्ना दिवाडकर

**मुखपृष्ठ:** सोहम राहुल पारठे

**रचना व मांडणी :** अश्विनी राहुल पारठे




# अध्यक्षांचे मनोगत



**नमस्कार मंडळी,**

आपल्या सगळ्यांसमवेत पारंपारिक सण, विविध धार्मिक-सामाजिक कार्यक्रम आणि सोहळे साजरे करताना, म्हणता म्हणता या वर्षीच्या गणपती बाप्पांच्या आगमनाचे वेध लागले. पुन्हा एकवार आपण सगळे मोठ्या उत्साहाने तयारीला लागलो. गणेशोत्सव म्हणजे आनंद, उल्हास, नवचैतन्याची उधळण! ६४ विद्या आणि १४ कलांचा अधिपती असलेल्या, विघ्नहर्त्या गणपती बाप्पांच्या मंगल चरणी, विविध कलांद्वारे अर्पिलेली - छोट्या गणेशभक्तांची - सुमनांजली म्हणजे या वर्षीचा कार्यक्रम "लहानपण देगा देवा". मी खात्रीने सांगतो की हा कार्यक्रम बघतांना आपण सर्वजण आपल्या बालपणीच्या रम्य आठवणीत अगदी १००% रममाण होणार! बाबा लोक आपले व्हिडिओ कॅमेरे घेऊन सज्ज असतील तर स्टेजवर जाणाऱ्या आपल्या लेकींना तयार करताना आयांची मात्र थोडीशी दमछाक झाली असेल. पुढच्या पिढीचा आत्मविश्वास, परिश्रम आणि कलाविष्कार बघून समस्त पालकांचे, विशेषतः भारतातून आलेल्या आजी-आजोबांचे ऊर कौतुकाने भरून येईल.

मला अभिमान वाटतो की संपूर्ण वर्षभरात सादर होणाऱ्या जवळ-जवळ तीस-एक कार्यक्रमांच्या विविध संकल्पनांना वास्तवतेचे रूप देण्याचे काम माझी टीम अत्यंत मनापासून करते आहे. दिवसा फुलटाईम जॉब आणि त्यानंतर संध्याकाळी, मंडळाच्या planning मिटिंग मध्ये सगळी टीम व्यस्त असते. लहान असो वा मोठा, कुठलाही कार्यक्रम यशस्वी करण्यामागे सगळ्या टीम्सनी एकमेकांवर विश्वास ठेवत एकजुटीने काम करणं हे खूप महत्वाचं असतं. खेळीमेळीच्या वातावरणात लहान-मोठ्या, नवीन जुन्या मित्रमैत्रिणींसोबत कामाच्या वाटण्या होतात, आणि ठरल्याप्रमाणे - किंबहुना त्यापेक्षा जास्त - कार्यक्रम रंगतो. त्यासाठी घेतलेली मेहनत, अपार परिश्रम सार्थकी लागल्याचं समाधान मिळत. आपापले नोकरी-धंदे, घरच्या-मुलांच्या सगळ्याच जबाबदाऱ्या सांभाळत निव्वळ आपल्या मंडळाच्या प्रेमापोटी कार्यकर्ते अखंड राबत असतात. त्यांची ही नि:स्वार्थ कर्तव्यदक्षता आणि आत्मीयता पाहून मी भरून पावलो .

सर्व सभासदांच्या आवडीनुसार उत्तमोत्तम कार्यक्रम आयोजिण्याचा माझा आणि माझ्या टीमचा मानस तर आहेच. पण यावर्षी आम्ही काही नवीन उपक्रम हाती घेतले आहेत. आपल्या Health & Wellness संबंधित उपक्रमाद्वारे, Yoga व्यतिरिक्त, Diet & Nutrition आणि Mental Health या विषयांवर Webinars introduce केले. आणि त्याबरोबरच हल्लीच झालेल्या Kidney Disease (Awareness & Screening) Health camp चा सभासदांनी लाभ घेतला.

आपल्या तरुण पिढीसाठीदेखील नेहेमीपेक्षा वेगळे आणि innovative असे कार्यक्रम करण्याचा आमचा प्रयत्न आहे. २२ ऑगस्टला University Admissions Seminar द्वारे मुलांना कॉलेज/admission बाबतीत मार्गदर्शन मिळाले. दुसरं महत्वाचं म्हणजे २१ सप्टेंबर ला आपण पहिल्यांदाच "Youth Innovation Summit " हा नवीन उपक्रम सुरु करत आहोत. त्याचा विद्यार्थ्यांनी व त्यांच्या पालकांनी देखील नक्की लाभ घ्यावा. अधिक माहितीसाठी email आणि Facebook page नक्की follow करा.

यावर्षी launch केलेल्या "Mandal" App द्वारे आगामी कार्यक्रमांची माहिती आपल्याला मिळत राहील, ह्या App चा आपण सर्वांनी आवश्य लाभ घ्यावा. Last but not least, मला कळविण्यात अत्यंत आनंद होत आहे की, मंडळाच्या इतिहासात प्रथमच आपण (६ ऑक्टोबर रोजी) नवरात्री-गरबा night करत आहोत. त्यात तुम्ही नक्की मोठ्या संख्येने उपस्थित राहून, गरबा-दांडीयाचा आनंद लुटाल अशी मी आशा करतो. ह्या कार्यक्रमाची अधिक माहिती आम्ही आपल्याला लवकरच कळवू.

ह्या नवीन योजनांना आपलंस करून तुम्ही माझ्या आणि माझ्या टिमच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहिलात. आपण सर्वांनी कधी कौतुकाने पाठीवर शाबासकीची थाप दिलीत, तर प्रसंगी अगदी हक्काने, काही न रुचलेल्या गोष्टीदेखील तात्काळ माझ्या निदर्शनास आणल्यात.  माझ्यावर दाखविलेला विश्वास आणि आपण सर्वांनी दिलेल्या प्रोत्साहनाबद्दल मी आपणा सर्वांचा सदैव ऋणी असेन.

आपलाच विनम्र

***प्रशांत जावकर***

प्रेसिडेंट २०२४ - महाराष्ट्र मंडळ ऑफ डेट्रॉईट



# Our MMD Executive Team Wishes You

|  |  |  |  |  |  |
|---|---|---|---|---|---|
| **Prashant Javkar**<br>*President* | **Sonali Mohile**<br>*Vice-President* | **Amit Deshpande**<br>*Vice-President* | **Rajesh Oak**<br>*Secretary* | **Amit Newalkar**<br>*Co-Treasurer* | **Sampada Burande**<br>*Treasurer* |

# गणपती बाप्पा मोरया



May Ganesha
Always Stay As
Your Mentor and Protector
and Remove Obstacles
From Your Life.
Wishing You and Family
a Happy and Blessed
**Ganesh Chaturthi!**



# Prabhakar Patil & family
# Wish you all




# Happy Ganesh Chaturthi



# Rahul Parthe & Family

## wishes you

# Happy Ganesh Chaturthi!

# Happy Ganesh Chaturthi From



PATEL BROTHERS®

Wishes you all



Happy Ganesh Chaturthi

गणपती बाप्पा मोरया

# शाळेसि जाताना

"शाळेसि जातांना मुलांनी वाटेत तमाशा पाहात थांबू नये, थांबू नये"

शालेय शिक्षण फारच कमी लाभलेली आमची आजी आम्ही शाळेला जायला निघालो की हे गाणे तिच्या सुरेल आवाजात म्हणत असे. इतरही शेकडो गाणी, म्हणी, श्लोक, सुभाषिते यांचा खजिनाच तिच्या जिभेवर तय्यार असे. अर्थात या बहुमोल उपदेशाकडे आम्ही नेहमीप्रमाणे दुर्लक्ष केलं की "म्हणतात ना... नळी फुंकिली सोनारे, इकडून तिकडे गेले वारे" अशी भलावण ती करीत असे.



"काहीतरी काय आजी, तुळशीबागेत कसला आला आहे तमाशा?" या अगोचर प्रश्नाला उत्तर म्हणून ती "शाळेच्या मुलांना वाटेत किती वाईट प्रलोभने सापडू शकतात " हे मोठ्ठे भाषण देणार, तेवढ्यात दोन-तीन मैत्रिणींचा घोळका दारात येऊन हाकारे द्यायला लागायचा, मग काय, पायात चपला अडकवून धावतच सुटायचं! शाळेच्या वाटेवर हा घोळका आठ- दहा- बारा असा फुगलेला असायचा आणि कलकलाटही चांगलाच वाढलेला असायचा.

"काहीतरी काय आजी, तुळशीबागेत कसला आला आहे तमाशा?" या अगोचर प्रश्नाला उत्तर म्हणून ती "शाळेच्या मुलांना वाटेत किती वाईट प्रलोभने सापडू शकतात " हे मोठ्ठे भाषण देणार, तेवढ्यात दोन-तीन मैत्रिणींचा घोळका दारात येऊन हाकारे द्यायला लागायचा, मग काय, पायात चपला अडकवून धावतच सुटायचं! शाळेच्या वाटेवर हा घोळका आठ- दहा- बारा असा फुगलेला असायचा आणि कलकलाटही चांगलाच वाढलेला असायचा.

घर ते शाळा या प्रवासात बरेच थांबे असत. लिली लोणकर खिसा भरून शेंगदाणे घेऊन येई व प्रत्येकीच्या हातावर थोडे-थोडे ठेवून देई. अनु जोशी तिच्या मागच्या अंगणातले तीन चार पेरू दप्तरातून काढी आणि मग "चिमणीच्या दातांनी" त्यांचे वाटप होई.

कोपऱ्यावर शालू-मालू या जुळ्या बहिणी वाट बघत उभ्या असायच्या. शालू नेहमी सगळ्यांना आठवण करून द्यायची....

"ए, गणिताचा गृहपाठ झाला का ग?"

"गायनाच्या वह्या आणल्यात ना?'

"शेंडेबाईंनी सांगितलेली कविता पाठ झाली ना?"

"चित्रकलेच्या सरांसाठी पाच चित्रं काढून आणली ना?"

कोणाची कविता पाठ नसेल तर सगळा घोळकाच कविता म्हणत शाळेच्या दिशेने कूच करायचा.

वाटेत "तू मला पटकन चित्रं काढून दे, मी तुझे शिवणकाम करीन" असे करारही व्हायचे.

"नाहीतरी मागच्या शिवणाच्या तासाला तुझे वाकडे-तिकडे टाके बघून बाईंनी तुला कात्रीने ठोकलं होतं -आता त्या जरा खूष होतील "

"बास-बास. एवढी नकोय मिरवायला शिवणकामातली हुशारी. मला कशाला विचारतेस चित्रं काढायला" इत्यादी लहानसहान चकमकी घडायच्या. पण त्या तात्पुरत्याच.

एवढा मोठ्ठा गलका करत चाललेला घोळका रस्त्यावर कोणाच्या डोळ्यात सलणार नाही असे कसे होईल?

"चालल्या पेशव्यांच्या घोड्या"

"अरे झाशीच्या राण्या आल्या रे आल्या" असे शेलके आहेर काही मत्सरी वृत्तीच्या, दुसऱ्या शाळांमधील विद्यार्थ्यांकडून ऐकू येत, पण तिकडे संपूर्ण दुर्लक्ष करून घोळका पुढे जाई.

"अरे झाशीच्या राण्या आल्या रे आल्या" असे शेलके आहेर काही मत्सरी वृत्तीच्या, दुसऱ्या शाळांमधील विद्यार्थ्यांकडून ऐकू येत, पण तिकडे संपूर्ण दुर्लक्ष करून घोळका पुढे जाई.

वाटेत सर्वात महत्वाचा थांबा म्हणजे "तुळशीबाग"! नवनवीन प्रलोभनांनी भरून वाहणारी छोटी-छोटी असंख्य दुकानं. गर्दीतून वाट काढत त्यातला माल चालत-चालतच डोळ्यात साठवून, येत्या शनिवारी/ रविवारी आई-मामी-मावशी कोणाकडे हट्ट करून काय काय मिळवायचं याची डोक्यात यादीच तयार व्हायला लागायची. जवळच तयार कपड्यांच्या दुकानांच्या ओळी. मग चार-सहा महिन्यांनी होणार असलेल्या चुलत बहिणीच्या लग्नासाठी कुठला ड्रेस हेरून ठेवायचा, कुठली "कल्पना साडी" लाटायची वगैरे वगैरे खमंग चर्चा.

दोघी-तिघी मैत्रिणी जरा मागेच रेंगाळत चालायच्या. त्यांचे गोष्टीच्या पुस्तकाचे सामुदायिक वाचन चालू असायचे- म्हणजे चालतांना निलू पुस्तक उघडून मोठ्याने वाचत असायची, व तिचे दप्तर, डबा सांभाळत इतर दोघीजणी "सिंदाबादची दुसरी सफ़र" एकाग्र चित्ताने ऐकत असायच्या. मधेच रस्त्यात पडलेल्या शेणात तिचा पाय पडू नये म्हणून तिला जरा बाजूला ढकलायचे, पण कथावाचन व श्रवण मात्र अबाधित चालूच राहायचे.

तुळशीबागेच्या मोहमयी दुनियेतून बाहेर पडल्यावर सुरु होणार बाजीराव रोड/लक्ष्मी रोडवरचा चकचकाट. आता शाळा जवळ आली आहे. उशीर होण्याच्या भीतीने पावले

चटचट उचलली जात आहेत....पण..

शाळेच्या दारात चारपाच विक्रेते गोणपाटावर सर्वात लाडक्या वस्तूंचे छोटे -छोटे ढीग घालून बसले आहेत. साध्या चिंचा, गाभुळलेल्या चिंचा, लाल चिंचा, टप्पोरे हिरवे आवळे, राय आवळे- सारी प्रलोभने डोळे मिचकावून बोलावत आहेत. क्वचितच एखादीकडे पाहुण्यांनी जातांना दिलेल्या बक्षिसीमधील एक-दोन आणे शिल्लक असायचे. मग ती एक वाटा घेऊन त्याचे जपून विभाजन करत असे किंवा मधल्या सुट्टीत वाटण्यासाठी दप्तराच्या खिशात ठेवून देत असे.

वाटेत कधी कधी डोंबाऱ्याचा खेळ चालू असतो, गारुडी नागोबाला डोलावीत असतो, फुले मंडईच्या बाहेर दुकानांमध्ये रांगोळ्यांचे मनोहारी रंग पर्वतांच्या रांगांसारखे ओळीने शोभत असतात ते बघायचे असतात, कलाबतूंच्या विविध वस्तू नजरेखालून घालायच्या असतात, "ग्लोब" टॉकीजमध्ये कुठला सिनेमा लागला आहे ते बघून ठेवायचे असते.....

पण शाळेत पाऊल पडल्याबरोबर सगळी किलबिल, गोंगाट एकदम थांबतो. शिक्षिकांची करडी नजर गणवेश, केशभूषा वगैरेवर फिरत असते. "प्रिय अमुचा एक महाराष्ट्र देश" 'अभिवंदन हे भारत माते " वगैरे होईपर्यंत सर्वजणी "हुजुरपागेच्या सुशील कन्या" मूडमध्ये येतात आणि पहिल्या तासाची घंटा होते.....

– **डॉ. वीणा शहा**









Dr. Bhogaonkar and family

Wishes you all

**Happy Ganesh Chaturthi**






# Happy Ganesh Chaturthi From

KURRYS
INDIAN CUISINE

24361 Halsted Rd, Farmington Hills, MI 48335

248-826-2014

/kurrysrestaurant

www.kurrys.com

meijer

Wishes you all



Happy Ganesh Chaturthi

# गणपती बाप्पा मोरया

From

**Pradeep Kokate and Family**




## Our 2024 MMD Team

Wishes you



Shiznay Events & Productions

# Shiznay Events & Productions

Shiznay Events & Productions

## About us

- Multinational & Michigan's #1 Desi / Bollywood Events Promoter (Nightlife x Private Gigs x Concerts)
- Entertained ~50K people in Michigan over the years
- One stop shop for all your event needs

## Services

- International & Reputed DJs
- Sound & Lighting
- Rigging Setup
- Live Streaming
- Photo & Videography
- Dancing in the Cloud
- CO2 Cannons
- Cold Fireworks
- LED Display & Dance Floor
- Other Special Effects
- Event Decors









All Types Of Private Events

**Inquiries/ Bookings**

(408) 673-7860 Mishiznay@gmail.com

shiznayevents shiznayevents

# वानप्रस्थ



माझ्या शेजारच्या घरात एक खूप वयस्क जोडपे रहाते. जवळपास नव्वदीच्या वयाचे गृहस्थ आणि ३-४ वर्षाच्या फरकाने त्यांची पत्नी. दोन्ही मुले कॅलिफोर्निया येथे स्थायिक. गेल्या साधारण सहा सात वर्षाच्या वास्तव्यात मी त्यांची तब्येत सतत खालावत चाललेली पहातोय. तरीही दोघे सतत बाहेर बागकाम करत असतात. बागेची निगा, झाडांची काटछाट, weeds काढणे, mowerने गवत कापणे अशी कामे रोज चालू असतात.

त्यांना या वयात ही शारीरिक कामे करताना पाहून, विशेषतः गाडी चालवताना पाहून माझ्या मनात विचार येतो की अशी risky lifestyle हे कशाला जगतात. कुठेतरी independent assisted living community मध्ये किंवा निदान कॉंडो मध्ये का राहत नाहीत. पण त्यांच्याशी झालेल्या काही मोजक्या संवादातून इतका निष्कर्ष निघाला की चाळीसहून अधिक वर्षे या घरात राहिल्यानंतर त्यांना ती स्वतंत्र राहणी सोडणे कठीण वाटते.

नुकतेच ‘जो बायडन’ प्रकरण आपल्या सर्वांची उत्कंठा वाढवून गेले. चार वर्षांपूर्वी मी अतिशय उत्साहाने ज्याला मत दिले, ज्याचे समर्थन केले त्याने आता पुन्हा या वयात प्रयत्न करू नये हे माझे खूप आधीपासूनचे मत होते. नव्या दमाच्या, नव्या पिढीच्या उमेदवाराला सूत्रे देण्याऐवजी लहान मुलासारखे "मी मी" चा हट्ट आणि अट्टाहास मला काहीसा असह्य झाला. अर्थात एका माणसाला दोष देणेही बरोबर नाही. ‘पार्टीतली इतर बुजुर्ग मंडळी चार वर्षे झोपली होती की काय’ असा प्रश्नही पडतो. असो, तर इथे सत्ता आणि मीपणा सहजी सोडवत नाही हे ठळक दिसते.

माझी आई टिव्ही वर मराठी - हिंदी सीरिअल्स पहायची. त्यात सासू-सुना, आई-वडील व मुले यांच्यातील वाद, अगदी सतत रंगवून दाखवले जायचे. त्याची खिल्ली उडवता उडवता मीही आईला सांगायचो "हे बघ, तू तुझी कर्तव्ये पार पाडलीस. तुझी मुले, त्यांची मुले सर्व काही व्यवस्थित आहे. मग उगाच ह्याची काळजी, त्याची काळजी करणे, हे असे का, तसे का वगैरे विचारणे हे सगळे सोडून दे. अगदी निश्चिंत आयुष्य जग!". अर्थात आईला संसारातून ही असली विरक्ती घेणे अवघड होते. She was too invested in our lives. आणि त्यातून अंग काढून घेणे तिला कठीण होते.

या सर्वातून मला वानप्रस्थ ही प्राचीन राहणीमानातील एक प्रकार किंवा संस्था आकर्षित करते. निदान conceptually तरी. बहुतेकांना महाभारतातील कथेतून हे परिचित असेल. मध्यम किंवा उतारवयात, एकदा पुढची पिढी मोठी होऊन कर्ती झाली, की आपण स्वतः संसारातून दूरस्थ होऊन विरक्ती घ्यायची आणि बहुतेक सुख-भोगाच्या गोष्टींचा त्याग करून वनात जाऊन राहायचे असे काहीसे. कुंती, गांधारी, धृतराष्ट्र आणि पुढे द्रौपदीसोबत पाचही पांडव यांनी याचा स्वीकार केला होता.

आजच्या युगातही आपण निदान ही mentality आत्मसात करायला हवी असे मला स्वतःला वाटते. सर्व सोडून वनात जाऊन राहावे असे नाही. पण 'अडकून रहाणे' ह्या वृत्तीचा त्याग करावा. एकदा आपली कर्तव्य पार पाडली की तुमच्या आयुष्याचा focus बदला, स्वतःला वेगळ्या कशात तरी रमवा. प्रवास करा, नवा छंद जोडा, नवे मित्र मंडळी शोधा. उगाच घर, व्यवहारात खूप अडकू नका, मुलंबाळं यांच्या आयुष्यात नको तेवढी लुडबुड करू नका. त्यांना त्यांचा स्वतःचा मार्ग शोधू द्या, स्वतःच्या सोयीने, हवे तसे जगू द्या. तुमच्यावाचूनही त्यांचे पान हलू शकते हे जाणून घ्या. Diminishing returns हा concept कालांतराने आपल्यालाही लागू होतो हे स्वीकार करा म्हणजे उगाच नंतर हिरमुसायची वेळ नाही येणार.

मला empty nester हा शब्दही बोचतो. एकतर ज्याअर्थी आपण वापरतो ते बरोबर नाही. जेव्हा पिल्ले मोठी होऊन घरटे सोडून निघून जातात तेव्हा ती नरमादी पक्षांची जोडी त्या घरट्यात तशीच, मागे राहते असं नाही. नक्की कुठे जाते माहीत नाही.

दोघेही कदाचित नविन घरटे, नवे कुटुंब यात रमतात किंवा त्याच घरट्यात पुन्हा नवे कुटुंब सुरू करतात. मग आपण तरी कशाला आपले घरटे रिकामे होऊ द्यायचे! मी वर म्हणालो तसे नव्या गोष्टींनी ते घरटे समृध्द करा. मुक्त व्हा, मोकळे व्हा.

कुछ पाकर खोना है, कुछ खोकर पाना है,
जीवन का मतलब तो, आना और जाना है

**– सुरेश नायर**



गणपती बाप्पा मोरया




SAT Math & English Test Prep Classes

The EDucation ENrichment Center


www.ed-en-center.com
248.528.1455
2328 Livernois Road, Troy, MI 48085

We have experienced teachers provide a structured approach to help students learn new math concepts, improve language arts abilities, and boost test scores

ACT/SAT Test Prep
- ACT Prep course
- SAT Prep course
- Test practice and reviews

Math
- K-5 Math
- Pre-Algebra
- Algebra I
- Algebra II
- Geometry
- Trigonometry
- Pre-Calculus
- Calculus

English
- K-12 Language Arts
- Grammar
- Reading Comprehension
- Writing
- Vocabulary




*Wish you all Happy Ganesh Chaturthi*







# Happy Ganesh Chaturthi



# Happy Ganesh Chaturthi


SK International

ENGINEERED EXCELLENCE.

## ENGINEERING, DESIGN, AND MANUFACTURING SERVICES

### About Us

SK International, an ISO 9001 certified company, is a leading provider of engineering services and automation solutions. We specialize in custom engineering works and in the making of special purpose machines that are tailored to suit and adapt to all changing requirements. Some of our additional specialties include 3D CAD, Building Information Modeling (BIM), Civil Engineering, Factory Automation, Mechanical Engineering, and Precision Machined Parts.



46918 Liberty Drive, Wixom, MI, 48393

(248) 621-9608

sales@skinternational.us

www.skinternational.us


Pillars of Strength
and Character.
Premier Provider for Property and Casualty Insurance
HRTG
LISTED
NYSE
HERITAGE
Insurance
(855) 536-2744
www.heritagepci.com
WITH BEST COMPLIMENTS OF HERITAGE INSURANCE HOLDINGS, INC.
AND VIJAY S. WALVEKAR, ONE OF ITS FOUNDERS AND DIRECTORS.

# Happy Ganesh Chaturthi From




# ।। गणपती बाप्पा मोरया ।।

# Happy Ganesh Chaturthi

Taal

Taal Academy

Taal Academy of Kathak Dance

# Happy Ganesh Chaturthi




EXPERIENCE THE LIFE

MI ADVENTURES'23

# आजीची पावभाजी

एक होती ढोबळी, होती थोडी बोबडी
घालून हिरवा coat, हसायची मात्र लोटपोट.
एक होता Tomato, friend त्याचा Potato
गुबरे गुबरे गुलाबी गाल, उन्हात गेला की व्हायचे लाल.
एक होता Flower, उडवायचा सारखी Collar,
सगळे म्हणायचे त्याला म्हणूनच, Cauliflower.
बटाटे दादा आले तिकडून, सुटले होते त्यांचे पोट इकडून तिकडून.
प्यायचे पाणी गटांगटा आणि खायचे मटार मटामटा.
सगळे मिळून एकत्र, जमवणार होते फक्कड रात्र.
तेवढ्यात ....
तिकडून आला कांदा, म्हणाला झालाय एकच वांदा.
आत्ताच मी आजीचा ऐकलाय plan,
पावभाजीसाठी तिनी नविन आणलाय Pan.
आजी सांगत होती रेवाला, बटर लाव जरा पावाला,
हात धुवून ये जेवायला आणि बरोबर घेऊन ये नोवाला.
सगळे मिळून मारणार आहेत पावभाजीवर ताव,
अजूनही आपल्याला पळून जायला आहे वाव.
पण कसलं काय?
आजी didn't listen to their cry.
pan मधे केलं सगळ्यांना केलं मस्त fry,
अशी माझ्या आजीची पावभाजी, one day you must try.









**– अभिजित जोगदेव**






Travel mugs, bottle, coffee mugs
CUSTOMIZE YOUR APPAREL
T-Shirt, Hats, Sweatshirts, Golf Shirts, ETC.
-Embroidery
-Screen Printing
-Full-Color Printing
-Vinyl Names & Numbers
SAMI'S
ENGRAVING
& GIFTS
PERSONALIZED HOLIDAY GIFTS, & MORE...
Plaques
Trophies & Medals
Desk Clock
Full Color Mugs
Cutting & Serving Board
Rosewood Finish Martini Set
3-Piece BBQ Set
Corporate Gifts, Custom Engraving, Promotional Products
Visit us online or in store for more gift options and varieties
samisgifts@gmail.com | (248)-250-4931 • www.samisgifts.com • 4935 Rochester Rd, Troy, MI 48085


ROSHAN PATHRE
REAL ESTATE AGENT
LICENSED RESIDENTIAL & COMMERCIAL REALTOR®
MICHIGAN POWER BROKERS
(248) 925-8524
roshanpathrerealestate@gmail.com
Contact me today for all your Real Estate needs!
MPB
MICHIGAN POWER BROKERS
REALTOR




# Happy Ganesh Chaturthi
## from
## || Maharashtra Mandal of Detroit ||

MANDAL




गणपती बाप्पा मोरया

## From
## Borkar and Family

# Happy Ganesh Chaturthi from



# GLOWING SMILES DENTAL

Dr. Kulbir (Nikki) Jassal, D.D.S.

1755 W Big Beaver Rd,
Troy, MI 48084
(248) 643-7530
www.glowingsmilesdental.com



# JAYA

TRAVEL & TOURS



- **TROY**

2916 E LONG LAKE RD, TROY, MI 4808

PH – 248-250-9708

JAYMUNJ.COM

- **ROCHESTER**

1461 N ROCHESTER RD, ROCHESTER HILLS, MI 48307

PH – 248-218-2526

AGENTJAYMUNJ.COM



# JAY MUNJ STATE FARM.

# जीवन दुःखमय झाले आहे का?

खरोखर, 'आपले जीवन दुःखमय झाले आहे का' हा चर्चेचा विषय वाचून सुखमय जीवन की दुःखमय जीवन हे ठरविण्याचे काही गणित आहे का? असा प्रश्न माझ्या मनात तात्काळ उभा राहिला. हे कोणी, कसे ठरवायचे हो? हा तर प्रत्येकाचा व्यक्तिगत दृष्टिकोन आहे असे माझे ठाम मत आहे.

परवा परवाच माझ्या वाचनात एक गझल आली,त्यातील एक शेर मला फार आवडला.....
*गुलमोहरास जमते ग्रीष्मात रंगणे जर*
*पाहून त्याकडे मग दुःखात हासते मी*
यात गझलकाराने गुलमोहराच्या झाडाचा फार छान दृष्टांत दिला आहे. ग्रीष्माच्या रणरणत्या उन्हात, उष्णतेचा दाह असताना गुलमोहर कसा अगदी लाल केशरी फुलांनी रंगून गेला आहे. थोडक्यात जीवनातील कठीण प्रसंग जे दुःखदायी असतात ते कसे झेलायचे?
त्या दुःखाला कवटाळून दुःखच करीत बसायचे की जीवनातील जमेची बाजू आठवून त्या दुःखावर मात करून पुढे जायचे हे ज्याच्यात्याच्या प्रकृतीवर अवलंबून आहे.

आज पर्यंतच्या या दीर्घ आयुष्यात अनेक माणसे जवळून पाहिली, कुटुंबातील, नात्यातील माणसे तर अनुभवली. त्यातील काही सतत हसत राहणारी, खिलाडू वृत्तीची. तर काही कोणताही दिवस असो, रात्र असो, सणवार असो की काहीही असो,सदैव त्यांचा चेहरा दुर्मुखलेला, दुःखीकष्टीच!
"काय वहिनी कशा आहात? काय चाललंय?" असा सहज प्रश्न विचारला तरी केव्हाही त्यांचं उत्तर एकच.
"काऽऽय सांगायचं, चाललंय. तब्येत नसते हो बरी." त्या कायम आजारीच. कसला उत्साह नाही की चेहऱ्यावर कधी आनंद नाही. आता अशा व्यक्तीचं जीणं हे दुःखमयच म्हणायचं का?
त्यांच्याच घरात बाकी सर्व आनंदी आणि या वहिनीच तेवढ्या दुःखी!

मला जर कोणी विचारलं तर मी म्हणेन, "जगावं कसं तर फुलपाखरासारखं. हसत, खेळत, बागडत, या फुलावरून त्या फुलावर....."

शहरात राहणाऱ्या चाकरमान्यांचा जर आपण विचार केला तर ट्रेन गाठण्यासाठी करावी लागणारी पळापळ, माणसांची अलोट गर्दी,(मी हे मुंबई नगरी डोळ्यासमोर ठेवून लिहीत आहे) त्या गर्दीतून कर्जत ते मुंबई, किंवा विरार ते चर्चगेट असा लांब पल्याचा उभ्याने प्रवास, दहा मिनिटे उशीर झाला तर मस्टर जाण्याची चिंता, तीन लेट मार्क झाले तर एक कॅज्युअल कमी होईल याचा सतत असलेला तणाव, या व अशा गोष्टींचा विचार करता हे सर्व दुःखमय आहे, परंतु तो रोजच्या जीवनाचाच एक अविभाज्य घटक आहे असे मानून त्यातूनही आनंद मिळविणारे किती लोक आहेतच की.

अहो, महिलांच्या डब्यात तर महिला अंताक्षरी खेळतात, चैत्रगौर, मंगळागौर,संक्रांत वगैरे हळदीकुंकू ही
त्या गाडीच्या डब्यातच करतात. एकमेकींना वाणं देतात, त्या दिवशी चांगल्या नटून थटून दागदागिने घालून येतात, मस्त मजा करत, दिवसभराचा शीण घालवत संध्याकाळी घरी परततात.
मी सुद्धा ट्रेनमध्ये किती भरतकाम आणि विणकाम केलं आहे, आणि त्यातून नवनिर्मितीचा आनंद उपभोगला आहे.

तीस चाळीस वर्षांपूर्वीचा हा काळ खूप वेगळा होता हे मला मान्यच आहे. माणसातली माणुसकी ओसरत जाऊन जो तो स्वार्थ-साधू बनतो आहे,स्वतः खेरीज त्याला दुसऱ्याचा विचार करण्यास मुळीच वेळ नसतो. समाजात विकृतीही जरा जास्त प्रमाणातच दिसू लागली आहे. या गोष्टींमुळे सामान्य मध्यमवर्गीय समाजाचे जीवन दुःखमय झाले आहे हे अगदीच खोटे आहे असे मी म्हणणार नाही,परंतु माणुसकी पूर्णतया लयास गेली आहे का? अजूनही मदतीचा हात देणारे आहेतच की!

बाबा आमटे, प्रकाश, विकास आमटे या कुटुंबास काय म्हणावे? ही तर देव माणसेच हो! 'कौन बनेगा करोडपती' हा टीव्ही शो जर पाहिला तर आपल्याला अशी कितीतरी नावे कळतात की जे समाजातील पीडितांसाठी, एकेकदा पदरमोड करूनही कार्य करत असतात.

बऱ्याचदा नैसर्गिक आपत्तीमुळे जीवन दुःखमय होते. अवकाळी पावसामुळे पीक पाण्याचे नुकसान होणे, किंवा वेळेवर पाऊस न पडल्यामुळे दुष्काळाला सामोरे जाणे या घटना अत्यंत दुःखमय आहेत. हजारो शेतकऱ्यांच्या आत्महत्या हा जळजळीत दुःखाचा प्रसंग आपल्या सर्वांच्या डोळ्यासमोर आहे. होते नव्हते ते सर्व हरवून बसलेला माणूस हतबुद्ध होऊन शेवटी आत्महत्या करतो. असे जरी असले तरी यातून बाहेर पडण्यासाठी सरकारी यंत्रणा कार्यरत आहेच ना?

अशा प्रसंगी मला कुसुमाग्रजांच्या कणा या कवितेची आठवण येते. पावसाच्या पुरात सर्वस्व हरवून बसलेला माणूस,फक्त त्याची पत्नी त्याच्यासोबत आहे या एका सकारात्मक गोष्टीमुळे त्याच्यातील मनोबल अद्यापही शाबित आहे. त्याला कुणाकडूनही आर्थिक मदतीची अपेक्षाही नाही,
तो फक्त त्याच्या सरांना म्हणतो,
* पाठीवर हात ठेवून सर*
* तू फक्त लढ म्हणा.*
केवढी ही सकारात्मकता!
केवढा हा आत्मविश्वास!
दुःखातून सुखाकडे जाण्याचा निर्धार!

हा विषय तसा खूपच मोठा आहे. यावर लिहावे तितके थोडेच, परंतू एक गोष्ट नक्की सांगेन की सुख कशाला म्हणायचे आणि दुःख कोणते समजायचे हाच एक मोठा प्रश्न आहे.

कोणालाही त्याच्या प्रिय व्यक्तीचे निधन झाले की दुःख होणे स्वाभाविक आहे. आपण कितीही जरी म्हणालो, की देह हा नश्वर आहे, आत्मा अमर आहे. अगदी गीतेतील तत्त्वाप्रमाणे “वासांसि जीर्णानी यथा विहाय, नवानि गृण्हाति नरोऽपराणी” हे तत्व आपण मान्य केले तरी पडल्यावर जखम होतेच आणि जखमेवर खपली धरण्यास काही काळही जावा लागतो. म्हणूनच तर भा. रा.तांबे लिहितात,
* जन पळभर म्हणतील हाय हाय*
* मी जाता राहील कार्य काय*

जे संत आहेत त्यांचा देहाभिमान गळून गेल्यामुळे प्रिय व्यक्ती गमाविण्याचे दुःख त्यांना होत नसेल कदाचित!

मग अशा परिस्थितीत पूर्ण जीवनच दुःखी असे म्हणायचे का? अहो जीवन म्हणजे श्रावण मास. तेव्हा बालकवींनी म्हटल्याप्रमाणे

क्षणात येते सरसर शिरवे
क्षणात फिरुनी ऊन पडे
असेच आहे नाही का?

फुलांच्या पखरणीवरून चालत असताना मधूनच एखाद दोन काटे बोचले तर पायातला काटा काढून पुढे जाण्यास काय हरकत आहे?

– अरुणा मुल्हेरकर



गणपती बाप्पा मोरया



Law Office of
Leila Freijy PLLC
U.S. Immigration Law

# Wish you all



REMERICA®
INTEGRITY II REALTY

SureshHomes.com

(734) 394-9981
soldbysuresh@gmail.com



# THINKING OF BUYING OR SELLING?



**Call me today - for FREE market analysis and move with Suresh**

SFR SHORT SALES & FORECLOSURE RESOURCE · EQUAL HOUSING OPPORTUNITY · REALTOR® · MLS

For more information call

**SURESH VALSANGKAR**
Multi Million Dollar Producing REALTOR/ Notary Public
(734) 394-9981
41000 SEVEN MILE RD. I SUITE 105 I NORTHVILLE, MI 48167

- Over 29 years experience
- Multi Million Dollar Producing Realtor®
- Full time Realtor

# Thinking of Purchasing a Home??



No matter if you are buying your first home, moving across town or refinancing, Capital Mortgage Funding is here to help. We offer mortgage choices that can help make home ownership more affordable with the speed and service you deserve.



- Fixed- and adjustable rate mortgages (ARMs)
- FHA, VA, Jumbo and Conventional loans
- Loans for first time homebuyers
- As low as 3% down
- Refinancing options

## Call me today!

CAPITAL MORTGAGE FUNDING
The Best Mortgage Banker
Powered by CMG HOME LOANS
SIMPLIFIED. TRUSTED. COMMITTED.



**Ron Jacobs**
**Senior Loan Officer**
**NMLS#112741 | Branch NMLS# 2562040**
**Phone: (248) 821-7020**
**rjacobs@cmghomeloans.com**
**www.capitalmortgagefunding.com**
**Licensed: MI**

*Click here to download my app!*

Capital Mortgage Funding is powered by CMG Home Loans, NMLS ID# 1820. CMG Mortgage, Inc. dba CMG Home Loans, NMLS ID# 1820 (www.nmlsconsumeraccess.org), is an equal housing lender. Regulated by the Division of Real Estate. Georgia Residential Mortgage Licensee #15438. Ohio Mortgage Broker Act Mortgage Banker Exemption #MBMB.850204.000. Licensed by the NJ Department of Banking and Insurance. Registered Mortgage Banker with the Texas Department of Savings and Mortgage Lending. Licensed by the Virginia State Corporation Commission #MC-5521. To verify our complete list of state licenses, please visit www.cmgfi.com/corporate/licensing112741, 17170 W. 12 Mile Road Southfield, MI 48076 (JN#1281606811)

FORTUNE FOREVER

FINANCIAL SERVICES



# Wishes you all



# SENSORY REHABILITATION

### OUR VISION

Our vision is to continually seek to be an exceptional, patient-centered healthcare staffing organization that you can always trust.

### OUR MISSION

Our mission is to meet the equitable needs of our clients so that they have the necessary resources to reach their highest potential.

### OUR SERVICES

We are premium provider of various health care services including physical therapy, occupational therapy, speech therapy, and nursing.

## ABOUT US

Healthcare industry works tirelessly to provide exceptional care to everyone in need while facing many challenges. Challenges related to staffing, in particular, have become complex over the years and this is why Sensory Rehabilitation, LLC was established in 2017.

We work to create and develop a supplemental workforce consisting of motivated, talented, and highly-qualified professionals who meet the needs of your patients and facility. We really focus on getting to know you and your organization prior to delivering a provider who is right for both you and your patients.

## WHY CHOOSE US?

- 8 YEARS IN HEALTHCARE STAFFING SERVICES.
- FOSTER A CULTURE OF CARE, TRUST, HONESTY, RESPECT, AND BENEVOLENCE.
- PLACEMENT IN HOMECARE AS WELL AS OUTPATIENTS SERVICES.
- MORE THAN 25+ H1 APPROVAL AND 5 GREEN CARD APPROVALS.

sensoryrehabservices.com

sensory18@gmail.com

4413, Reilly Ct, Troy, Michigan, 48085

248-719-4827


STELLANTIS
CHRYSLER
CITROËN
DODGE
DS AUTOMOBILES
FIAT
Jeep
LANCIA
Maserati
OPEL
PEUGEOT
RAM
VAUXHALL
FREE2 MOVE

*Wishes you*


Happy
Ganesh
Chaturthi

# Happy Ganesh Chaturthi




# चिरा…

तसा आजचा पाऊस काही नवीन नव्हता आणि मी पहिल्या पावसात आधी भिजले नाहीये असंही नाही. पण आज काहीतरी वेगळं होतं. आज मात्र असं काहीतरी झालं की…
बरसणाऱ्या मेघांनी देह जरी भिजवला…
आठवणींच्या पावसात मन चिंब जाहलं
धुळीने माखलेल्या, रखरखत्या उन्हाने तापलेल्या जमिनीवर पडलेले ते पहिले थेंब, माझ्या लहानपणातल्या गारव्याकडे मला बोट धरून घेऊन गेले.

वय: साडे-चार वर्ष स्थळ: गोवा. काळ: मे महिन्याची सुट्टी

शांतामावशीचे सासर गोव्याचं. ती पणजीला नोकरी करायची. कुटुंब जवळच्या बांबोळींला क्वार्टर्स मधे रहायचं. उन्हाळ्याच्या सुट्टीत आईने मला आजोळी, मावशीकडे रहायला पाठवले होतं. पण "चिमणी घरात एकटी कशी रहाणार!" असं म्हणत हिरा मावशी मला त्यांच्या वडिलोपार्जित घरी घेऊन गेली (ह्यात माझ्या मस्तीखोरपणाचा हातभार नाकारता येणार नाही). हिरामावशी म्हणजे शांतामावशीची जाऊ. तिच्यासोबत आजी (मावशीच्या सासुबाई), जया काका (मावशीचे दीर), आणि कामाला घरातली नोकर मंडळी. जयाकाका आणि हिरामावशीला स्वतःची मुलं नव्हती. पण मुलांची आवड प्रचंड आणि माझ्यावर त्यांचा खास जीव (अर्थातच).



मला ते घर पहिल्यांदा पाहिलेलं लख्ख आठवतंय… सारवलेलं चिऱ्याचं कौलारू घर! समोरच्या अंगणात पारिजातकाचं आणि बकुळीचं झाड, तर मागे चाफा, मोगरा, सोनटक्का, अबोली, अनंत, सदाफुली, जास्वंद… अशी खूप खूप फुलझाडं. घरात शिरताच, मध्यभागी चौकात मोठठं तुळशी वृंदावन. डाव्या बाजूला सामान ठेवायची खोली आणि माडीवर जायचा जिना. उजव्या बाजूला देवघर, शेजारी आजीची खोली आणि त्या समोर झुलणारा (झोपता येईल इतका मोठा) झोपाळा! त्या झोपाळ्यावर बसलं की टेकायला दोन लोड आणि झोका घेतला की गोड आवाज करणारे, त्याला बांधलेले चिमुकले घुंगरू. पलीकडे स्वयंपाकघर, मागे न्हाणीघर आणि त्यामागे गोठ्यात म्हशी. दिवसभर बहुतेक म्हशी खालच्या अंगाला असलेल्या बागेत चरायला जायच्या. आंबा,काजु आणि आणखीन काही फळांची असेल बाग. त्याच्या पलीकडे सुपारी आणि नारळाची बाग, आणि त्याही पलीकडे थोड्या अंतरावर दूरवर पसरलेला समुद्र !!

आजीचा दरारा भारी होता. तिच्या शब्दाबाहेर जाण्याची कुणाची बिशाद नव्हती. सगळं कसं शिस्त-बद्ध लागायचं. पण आम्ही शेंडेफळ! आम्हाला सगळं माफ! नित्यक्रमच असला "सुशेगाद" होता ना…
असं बघा…मनाला येईल तेव्हा उठायचं. दात घासून होई पर्यंत आजी म्हशीचं दुध ताजं पिळून घ्यायची. मला खरं तर दुध अजिबात आवडायचं नाही. त्यामुळे आजीचं लक्ष नसेल तर ते दुध घरा मागच्या झाडांना कृष्णार्पणंअस्तु! नाहीतर जमेल तितका वेळ काढत झोपाळ्यावर झुलत ते प्यायचं. मग बाहेर मनसोक्त फुलं वेचायची. कधी कधी आजी त्याचा गजरा करायची. आंघोळ झाली की पेजेचं निवळ प्यायचं आणि खाली बागेत खेळायला अनवाणीच पळायचं. रस्त्यात कुणी "कोणाची चेडू गो तू (कोणाची मुलगी ग तू)?" असा प्रश्न विचारलाच तर "बोरकरांची!" असं उत्तर ओरडायला तयार होतंच. मला तर कोंकणी सुद्धा येत नव्हतं. पण म्हणून काय! मला मैत्री करायला वयाचं किंवा भाषेचं बंधन कधीच लागू पडलं नाही.


खाली बाळू नावाचा भरवशाचा गडी बागेत म्हशींसोबत असायचा. त्याच्याशी माझी पहिल्याच दिवशी गट्टी जमली होती. दिवसभर धांगडधिंगा! दुपारी कुणाच्या घरी जेवीन सांगता यायचं नाही. गावात कोणीही बोलवायचं. “निस्तें जाय (मासे हवे)?” असं नुसता विचारायचा अवकाश! आम्ही एका पायावर तयार. जेवल्यावर झोप आली, तर त्यांच्या घरी झोपायचे देखील. बाळूच घरी आणायचा मला आणि झोपाळ्यावर झोपवायचा (मला झोपाळा आवडतो म्हणून आजीचा हुकुम होता तसा). कधी कधी म्हशीवरून नाहीतर खांद्यावरून फिरवायचा. खरं सांगू? म्हशीवरून फिरायला जास्त आवडायचं मला. कधी कधी तर म्हशीवर झोपायचे सुद्धा. म्हशीच्या पाठीवर चढून कैरी, काजु

तोडलेत तुम्ही कधी? चीक अर्थातच लागायचा पेटीकोटला. अहो, पण इथे पर्वा होती कुणाला! सकाळी स्वच्छ असलेला पेटीकोट, संध्याकाळपर्यंत मातीत खेळून कळकट आणि पाय... ते मातीने लालबुंद! पण मला कधी कुणी रागावलं नाही. हिरामावशी उलट रोज रात्री न विसरता दगडानी पाय पुन्हा “गोरे” करायचा प्रयत्न करायची.

गाव खूप लहान नसलं तरी फार मोठं ही नव्हतं. बस गावाहून एक-दीड कि.मी वर येत असावी. गंमत म्हणून मी बस-स्टॉप पर्यंतही बरेचदा जायचे. तिथे “मामाचं” दुकान होतं. गोटीचा सोडा चार आण्याला मिळायचा तिथे. चव कसली बंडल होती हो त्याची. पण उघडताना येणारा चीर्रर आवाज झक्कास! ऐकायला जाम आवडायचा मला. मामा मला गल्यावर पैसे “मोजायला” द्यायचा (म्हणजे त्यानी दिलेली नाणी लोकांना परत द्यायला). तिथून गावापर्यंत आडोसा नव्हता. मातीच्या बांधांवरून चालत किंवा सायकलवरून गावात यायला लागे. मोटारगाडी येण्याइतका रस्ता अजून झाला नव्हता तेव्हा. पाऊस आला तर भिजणे हा एकंच खरा पर्याय. पण मला कधी चान्स मिळेल तर शपथ! कधी कुणी नारळाच्या झापाखाली घ्यायचं तर कधी केळीच्या पानाखाली. असं वाटायचं की मला सर्दी होऊ नये ही काळजी सगळं गाव घेतंय. पण पावसात आडोशाला उभं रहाण्यात कुठे आलीये मजा? मी चालबाजी करून तिथून सटकायचे आणि मातीच्या रस्त्यात झालेल्या असंख्य डबक्यात छपाक-छपाक उड्या मारत, लाल चिखलात खेळत हुंदडायचे. बागेत असताना पाऊस आला तर मग विचारायलाच नको! असं वाटायचं पानावर कधी तत्कार तर कधी तराना करतोय. पावसाच्या पाण्याने स्वच्छ व्हायचं सोडून आणखीन मळायचे मी कदाचित. पण तरीही विलक्षण स्वच्छ होते ते क्षण. त्या चिऱ्यातल्या, लाल मातीतल्या कणाकणात रुजलेला तो गोडवा, ती आपुलकी, ती माया अतिशय शुद्ध होती.

अचानक झालेल्या विजेच्या आवाजाने मी एकदम भानावर आले. वर्तमानात! पावसाचा जोर कमी झाला होता. आजूबाजूला पाहिलं... पावसाच्या पाण्याने झाडं, पानं, सगळा परिसर स्वच्छ झालेला दिसत होता. इथे चिरा नाही, मातीही लाल नाही. त्यामुळे मळण्याचे प्रसंगही तसे कमी. गोव्याला आता खूप वर्षात जाणं झालेलं नाही. पण कधी काळी खेळलेल्या त्या लाल चिऱ्याच्या मातीची गोड लाली मात्र जी माझ्या मनात चढली, ती आयुष्यभरासाठी ! तो रंग आता कायमचा...उतरणे शक्य नाही !

**– पूनम तोरगल**






FinesseAcademy

**Confidence Building & Public Speaking Course**

**PROGRAM DETAILS:**

- Session 1 In-person Troy -Wednesdays: Sept 25th - Dec 4th 7-8.30pm
- Session 2 Virtual - Thursdays : Sept 26th - Dec 5th 8-9.30pm
- Session 3 In-person Troy -Saturdays: Sept 28th - Dec 7th 7-8.30pm
- Session 4 In-person Livonia -Sundays: Sept 22nd - Nov24th 2-3.30pm
- Session 5 In-person Livonia -Sundays: Sept 22nd - Nov24th 4-5.30pm
- For more details, contact:

vidhi@finesseacademy.com 313-283-4343

**Happy Ganesh Chaturthi From**

MEDSTAR REHABILITATION SERVICES, INC

**PHYSICIAN'S PREFERRED PROVIDER FOR PHYSICAL,**
*OCCUPATIONAL, AND SPEECH THERAPY*
2050 HAGGERTY ROAD, SUITE 280
CANTON, MI 48187

**PHONE**: 734-844-0800 **FAX**: 734-844-0808
**EMAIL**: MEDSTARREHAB@MEDSTARREHAB.COM

kw CENTRAL
KELLERWILLIAMS.
35427 Dodge Park Rd. Sterling Heights, MI 48312
SELL IN A FLASH, CALL KASH!



REALTOR®, KASHMIRA DESAI
YOUR METRO DETROIT EXPERT
View What is *ACTIVE, PENDING & SOLD* in your Neighborhood go to www.kashmira.kwrealty.com
Cell (248) 974 6979 Office (248) 655-7955
realtor.kashmira@gmail.com

SRS

Each Keller Williams Office is Independently Owned and Operated



dwarkamai
KITCHEN FOOD

3709 Bristol Drive Troy 48083
**Sushama Mansukh : +1-7347768492 | +1 - 7342337348**
**E:** dwarkamaikitchenfood@gmail.com
**Follow us on:**

Sistar Mortgage
Company
A Nationwide Lender
Wishes You All



# Bhushan Kulkarni and family

*wish you all*



# गणपती बाप्पा मोरया

*5% Discount for MMD Members*











Selling or buying a home is perhaps the single largest transaction most of us will make in our lifetime.

Allow me the privilege of helping you with this decision.



***Prasanna Mohanachandran***

***REALTOR***

Office : (248) 524-1600
Mobile: (248) 670-1943
Fax : (248) 524-1427
***pm.tcagents@gmail.com***

**Call now (248) 670-1943 (Cell)**



Happy Ganesh Chaturthi

OAKLAND ORTHODONTICS

Dr. Archana Dhawan, DDS, MS
ABO Board Certified Orthodontist
2789 Rochester Rd.
Troy,MI 48083
Phone: 248-817-2623 Fax: 248-688-9528
Web: https://www.oaklandorthodontics.com/

## A Unique Opportunity



This summer, I had the privilege of interning with 'Mobilisights', a dynamic data-driven scale-up under the automotive giant 'Stellantis'. My journey began when I applied through Stellantis' general internship portal, coinciding with a career fair where I connected with their campus recruitment team. Attending the career fair after already applying demonstrated my initiative and enthusiasm for joining the company.

Perfecting my elevator pitch was pivotal throughout this process. It's essential to project confidence, engage thoughtfully with questions, maintain strong eye contact, and convey your experiences in a way that underscores your key contributions. Following up with connections on LinkedIn and via email helped sustain momentum and foster valuable relationships.

Once onboard, I became part of a cohort of 200 interns. My overall internship experience was immensely rewarding. I had the chance to learn a variety of programming languages and tools including PySpark and AWS services. I concentrated on data modeling, navigating large-scale datasets, and crafting insightful data visualizations. These experiences significantly expanded my knowledge of data analytics and its practical applications.

In such a large group, it was vital to distinguish myself as an intern by being proactive, making meaningful contributions, and cultivating strong connections with my team and mentors.

**– नेहा ऐगळीकर**

***Neha was one of the 5 finalists out of 200 interns who were showcased on Stellantis LinkedIn portal. She is the daughter of Varsha & Prasanna Aigalikar, Troy.***




Happy Ganesh Chaturthi
From
Dr. Atul & Dr. Madhavi Rajpurkar

HONEST

SKIP THE LINE, ORDER ONLINE

SCAN ME

TROY MI
248.315.0234

Wishes you all Happy Ganesh Chaturthi !!



FIVE OAKS DENTAL

Avneet Dhaliwal, DDS

We are a family dental office in Livonia, with focus on providing top quality care to all our patients in our spacious and modern office in Livonia. Accepting new patients now and children are welcome 🙂

Looks us up and book your appointment right away on

WWW.FIVEOAKSDENTAL.COM

Happy Ganesh Chaturthi


FOR ALL YOUR MORTGAGE NEEDS
VM
VEMA MORTGAGE LLC
SEBASTIAN GEORGE
Mortgage Broker
Contact me for a free rate quote
1-877-800-VEMA (8362)
saaby74@vemamortgage.com
We are open 24 X 7, 365 days a year


Shree's Boutique
Shree's Boutique
Sai Florist
Sai florist
Exclusive Collection of Jewelry & Clothing
All Indians Flowers, Garlands & Pooja Needs
Contact:
Vimala Kumarasamy, 174 W Maple Road, Troy, MI 48084
Mon-Fri 10.30 am to 02.00 pm & 05.00 pm to 08.00 pm
Saturday 10.30 am to 08.00 pm & Sunday 10.30 am to 06.00 pm
(309) 750 9374 & (248) 781-5460
shreesboutiqueusa
Shree's Boutique LLC
shreesboutique.com
saiflorist.com


Great Cars.
Great Sales.
Great Service.
Two great locations with more brands ready to serve you!
SERRA
FORD ROCHESTER HILLS
Ford
serrafordrochesterhills.com
2890 S Rochester Rd., Rochester Hills, MI 48307
Direct: 248.852.0400
SERRA
BUICK GMC ROCHESTER HILLS
BUICK GMC
serrabuickgmcrochesterhills.com
855 S Rochester Rd., Rochester Hills, MI 48307
Direct: 248.651.5500



Happy Ganesh Chaturthi!

RASNA

FOODS




Various Paint Technologies

- 2K Monocoat
- 2K Base/Clear
- 1K Waterbase
- 2K Waterbase
- One-Coat over TPO/PP
- Adhesion Promoters
- Laser-Etchable Coatings
- Soft-Touch Coatings
- Chrome-Look Coatings
- In-Mold Coatings
- Hydrographics Clearcoats
- Metallic Coating Finishes
- Non-Metallic Coating Finishes
- Much Much More...

## GLOBAL SUPPLIER OF COATINGS FOR PLASTICS AND METALS



Dhake Industries offers a wide range of products for Interior and Exterior Automotive Applications as well as other Non-Automotive Applications. Our products are custom formulated to meet the most stringent requirements of any market

- Known in the Industry for Unsurpassed Technical Capabilities
- Leader in Metallic Paint Development for Auto Interiors
- Rapid Product Development with Custom Formulations to Meet Market and Customer Specific Requirements

Dhake Industries

Please contact us for more information ▸▸▸

Global Headquarters
15169 Northville Rd.
Plymouth, MI 48170
734-420-0101
www.dhakeindustries.com

“आपले मंडळ ”

|| *Maharashtra Mandal of Detroit* ||

स्नेहबंध



# गणपती बाप्पा मोरया ! !

# पुढच्या वर्षी थाटात या ! !